# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# परिपत्रक

<u>तात्काळ-अत्यंत महत्वाचे</u>

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**विषय:-** संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून स्वीकारण्यात आलेल्या विविध अनामत रक्कमेसंदर्भात माहिती ऑनलाईन स्वरूपात तात्काळ सादर करणेबाबत...

**संदर्भ:-** १) विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण,कोल्हापूर यांचेकडील जा.क्र.विससं/कोवि/शिवि.अनु/२०२०-२१/४९२३ दि. २३/०९/२०२१ रोजीचे पत्र
२) शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण यांचेकडील एनजीसी/वि.स.अ.ता.प्रक्र.३५३४८/नांवि/मवि२ १०४३३ दि. २२/०९/२०२१ रोजीचे पत्र
३) क्र.विसप्र-२०२१/प्र.क्र.८८/विशि-५ उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई दि. २०/०९/२०२१ रोजीचा विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ३५३४८

**महोदय/महोदया,**

उपरोक्त नमूद विषय व संदर्भ अवलोकनी घेता सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी अतारांकित प्रश्न क्र. ३५३४८ मधील मुद्दे/प्रश्न क्र. १ ते ३ चे संदर्भाने केलेली कार्यवाही तात्काळ/विनाविलंब इमेलद्वारा (affiliation.t२@unishivaji.ac.in) या कार्यालयास दि. २४/०९/२०२१ पर्यंत सादर करावी.

सदरील माहिती प्रशासकीय व शासकीय कामी आवश्यक आहे. त्यामुळे सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी याची गांभीर्याने नोंद घेवून **तात्काळ/विनाविलंब** सदर माहिती पाठवावी.

आदेशान्वये
Sd/-
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

**संदर्भ क्र. संलग्नता टी-२/** 675
**दिनांक-** 23 SEP 2021

D:\KAUSTUBH\Circular 2019.docx

महाराष्ट्र शासन

# विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

राजाराम महाविद्यालय परिसर, सागरमाळ कोल्हापूर-४१६००४.

E-mail- jdunishivaji@gmail.com

दुरध्वनी क्रं.०२३१-२५३५४५४ फॅक्स क्रं.०२३१-२५३५४५४

जा.क्र.विससं/कोवि/शिवि.अनु/२०२०-२१/४९२३ दिनांक २३.०९.२०२१

विधानपरिषद तारांकित प्रश्न/प्रथम प्राधान्याने/अतितात्काळ

प्रति,

मा.कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**विषय - विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्रमांक ३५३४८**
**मा.श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स.**
**राज्यातील अनेक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची अनामत रक्कम वितरित न केल्याबाबत. .**

संदर्भ- १. संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/वि.स.अ.ता.प्र.क्र.३५३४८/नावि/मवि२/१०४३३ दि.२२.०९.२०२१
२.शासन पत्र क्र.विसप्र-२०२१/प्र.क्र.८८/विशि-५ दिनांक २०.०९.२०२१

महोदय,

शासन व संचालनालयाचे संदर्भिय पत्र अवलोकनार्थ सोबत जोडले आहे.

उपरोक्त विषयाबाबतचा अतारांकित प्रश्न स्वीकृत करण्यात आलेला असून त्यामध्ये नमूद प्रश्नांच्या अनुषंगाने प्रश्नोत्तरे स्वरुपातील माहिती व पूरक टिप्पणी तात्काळ **तात्काळ/विनाविलंब** संचालनालयाचे Email ID-**mavi.dhepune@Gov.in** तसेच या कार्यालयाचा Email ID-**jdunishivaji@gmail.com, jdhekop@gmail.com** वर तसेच हार्डकॉपीमध्ये पाठविण्यात यावी.

आपला विश्वासू,

(डॉ.हेमंत ना कठरे)
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

**सोबत** - वरील प्रमाणे

**प्रत :** मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर

जा.क्र. - 4787
दिनांक 22.9.21

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं . ०२०/२६१११११५३

क्रमांक- एनजीसी/वि.स.अ.ता.प्र.क्र.३५३४८/नांवि/मविर 908333 दिनांक - २२.९.२०२१ 22 SEP 2021

**विधानसभा अतारांकित प्रश्न/प्रथम प्राधान्याने/अतितात्काळ**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य,

**विषय -** विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक ३५३४८
मा. श्री लक्ष्मण जगताप वि.स.स.
राज्यातील अनेक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची अनामत रक्कम वितरित न केल्याबाबत

**संदर्भ** - शासन पत्र क्रमांक विसप्र-२०२१/प्र.क्र.८८/विशि-५ दिनांक २०.९.२०२१

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित शासन पत्राची छायांकित प्रत सोबत जोडण्यात येत आहे. सदर शासन पत्रान्वये कळविल्यानुसार विधान मंडळ सचिवालयामार्फत प्राप्त झालेला विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक ३५३४८ खालीलप्रमाणे आहे.

१. राज्यातील व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेत असतांना महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून ग्रंथालयातील पुस्तके, प्रयोगशाळेतील साहित्य हाताळणी क्रिडा साहित्य आदीसाठी विशिष्ट रक्कम डिपॉझिटद्वारे घेतात हें खरे आहे काय?
२. असल्यास, राज्यातील एकूण महाविद्यालयांची संख्या लक्षात घेता सदर विद्यार्थ्यांची कोटयावधी रुपयांची रक्कम विविध महाविद्यालयात अनामत रक्कमेच्या स्वरुपात पडून असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय?
३. असल्यास, विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालय प्रशासनामार्फत संबंधित रक्कम विद्यार्थ्यांना देणे अनिवार्य असूनही सदर रक्कम देण्यास महाविद्यालय दुर्लक्ष करीत आहे हे खरे आहे काय?
४. असल्यास, राज्याचे उच्च शिक्षण संचालक यांनी राज्यातील सर्व विभागीय संचालकांना पत्र पाठवून महाविद्यालयांकडे असणारे अनामत रकमेची माहिती देण्याचे आदेश माहे मार्च २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय?
५. असल्यास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाच्या उपकुलसचिव यांनी विद्यापीठाच्या संगीत महाविद्यालयांना प्राचार्यांना पत्र पाठवून अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांकडून घेत असलेली अनामत रक्कम परत करण्याचे आदेश दिले होते हे ही खरे आहे काय?
६. असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वाकरण्यात येत आहे

अधि ३१२१३
श्री जोग
Kw 22/9/21

७. नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

उपरोक्त प्रश्नाचे उत्त महाराष्ट्र विधानसभा नियम ७२(२) अन्वये तातडीने विधानमंडळ सचिवालायास सादर करावयाचे असल्याने विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक ३५३४८ बाबतची प्रश्नोत्तरे स्वरुपातील माहिती व पूरक टिपणी तात्काळ विनाविलंब संचालनालयाच्या मेल mavi.dhepune@gov.in वर तसेच हार्डकॉपीमध्ये पाठविण्यात यावी.

२२/०९/२४

(प्रमिला मराठे)
प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई -३२ यांना संदर्भिय शासन पत्राच्या अनुषंगाने माहितीस्तव सादर

# महाराष्ट्र शासन

**अतितात्काळ**
विधान मंडळ प्राथम्य

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११००१
21 SEP 2021
आवक क्रमांक :-
शाखा- ९२८

क्र.विसप्र-२०२१/प्र.क्र.८८/विशि-५
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २०/९/२०२१

प्रति,
संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
पूणे.

विशि प्रवि-२

विषय :- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.३५३४८-मा.श्री.लक्ष्मण जगताप , वि.स.स.
राज्यातील अनेक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची अनामत रक्कम वितरित न केल्याबाबत

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विधान मंडळ सचिवालयामार्फत प्राप्त झालेला विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.३५३४८ (प्रत सोबत) खालीलप्रमाणे आहे. :-

(१) राज्यातील व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेत असताना महाविद्यालये विद्यार्थ्याकडून ग्रंथालयातील पुस्तके, प्रयोगशाळेतील साहित्य हाताळणी क्रिडा साहित्य आदीसाठी विशिष्ट रक्कम डिपॉझिटव्दारे घेतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एकूण महाविद्यालयांची संख्या लक्षात घेता सदर विद्यार्थ्यांची कोट्यवधी रुपयांची रक्कम विविध महाविद्यालयात अनामत रक्कमेच्या स्वरूपात पडून असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालय प्रशासनामार्फत संबंधित रक्कम विद्यार्थ्यांना देणे अनिवार्य असूनही सदर रक्कम देण्यास महाविद्यालय दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्याचे उच्च शिक्षण संचालक यांनी राज्यातील सर्व विभागीय संचालकांना पत्र पाठवून महाविद्यालयांकडे असणारे अनामत रकमेची माहिती देण्याचे आदेश माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे. हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाच्या उप कुलसचिव यांनी विद्यापीठाच्या संगीत महाविद्यालयांना प्राचार्यांना पत्र पाठवून अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांकडून घेत असलेली अनामत रक्कम परत करण्याचे आदेश दिले होते हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

२. उपरोक्त प्रश्नाचे उत्तर महाराष्ट्र विधानसभा नियम ७२ (२) अन्वये तातडीने विधानमंडळ सचिवालयास सादर करावयाचे असल्याने, प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर व पूरक टिप्पणी तात्काळ शासनास पाठविण्यात यावी, अशी विनंती आहे.

आपला,

(कि. म. जकाते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

E:\Assembly Matter\Assembly Letter.docx